# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३१/०७/२०१६.

**१) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक २८/०७/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी रंजीत केशव भौवते वय २८ वर्ष, रा. कन्हाळगाव हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ४० एजी ०९४२ हिरोहोंन्डा स्प्लेन्डर कि. २०,०००/—रू. ची सा.रू. भंडारा येथील पार्कीगंच्या ठिकानी मोटार सायकल ठेवुन दवाखाण्यात वार्ड नं. ०७ मध्ये भरती असलेल्या बहीनीला पाहण्यास गेला व भेटुन आल्यानंतर ठेवलेल्या ठिकानी मोसा. दिसुन न आल्याने कोनीतरी अज्ञात चोराने मोटार सायकल चोरून नेला. फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरून भांडन केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी मिलींद कारूजी कानेकर वय ४९ वर्ष, रा. साईराम अपार्टमेंट साई मंदीर भंडारा हे व आरोपी एकाच साईराम अपार्टमेंट मध्ये राहतात यातील फिर्यादी हे मुलीला मोटार सायकल ने टिव्युशन मध्ये सोडुन अपार्टमेंट मध्ये मोटार सायकल ठेवण्यास गेला असता त्या दरम्यान आरोपीने आपली मोसा. काढुन जुन्या भांडनावरून शिवीगाळ, करून फिर्यादीला मोसा. सह ढकलुन लोखंडी पाईप ने डाव्या कपाळावर मारून जखमी केला. असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करून परवानगीचे उल्लंघन केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी १७.३० ते १८.३० वा. दर. यातील पाचही आरोपीतांनी सोंडयाउपसा सिंचन कालव्याचे विद्युत बिल भरण्यास व रेंगेपार पुनरवसन करण्याबाबत गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. तहसिलदार तुमसर यांनी दिलेल्या परवानगीचे उल्लंघन करून येणा—या जाणा—या वाहतुकीस अडथळा निर्मान केल्याने असे सर तर्फे फिर्यादी पो. शि. मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३४१,१४३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चिचखेडे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

४) मोटर वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक ३१/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०२ केसस, तिन सिटर वाहनांवरती १५ केसेस व इतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेल्या आहे

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.